# राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर
## पालि विभाग
## <u>सूचना</u>

दि. १८.०६.२०२०

**पाली अभ्यास मंडळाची बैठक...**

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येत आहे की, राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर येथे **दि. २३ जून, २०२० रोजी** सकाळी **ठीक ११.०० वा.** पालि अभ्यास मंडळाची ऑनलाईन बैठक आयोजित करण्यात आली आहे. बैठकीचे विषय : मागील बैठकीचा वृत्तांत वाचणे, फिडबॅकमध्ये काही सूचना आल्या असतील तर त्यावर चर्चा करणे, अभ्यासक्रमावर चर्चा करून त्यात काही बदल करावयाचा असल्यास आवश्यक ते बदल करणे, स्थानिक, राष्ट्रीय व आंतर राष्ट्रीय बाबींचा अभ्यासक्रमात सहभाग असावा हे निश्चत करणे आणि अध्यक्षांच्या परवानगीणे येणारे ऐन वेळीचे विषय.

तरी कृपया आपणास विनंती आहे की, आपण बैठकीस वेळेवर कनेक्ट व्हावे.

अध्यक्ष

**पालि अभ्यास मंडळ**

# पालि विभाग

## पालि अभ्यास मंडळाची बैठक

दि. 23 जून 2020 रोजी सकाळी 11:00 वाजता पालि विभाग प्रमुख प्रा. डॉ. एस. एम. सोनोने यांच्या अध्यक्षतेखाली झूमवर बैठक संपन्न झाली. या बैठकीत अभ्यास मंडळाच्या सदस्यांसह भिक्षू, विद्यार्थी–पालक, प्राध्यापक, अभ्यासक उपस्थित होते.

बैठकीत पुढील ठराव पारित केले.

1 प्रा. डॉ. एस. एम. सोनोने यांनी पेपर निहाय अभ्यासक्रमाचे वाचन केले.

प्रा. विनोद भेले यांनी लॉकडाऊन मुळे हा पेपर क्रमांक एकचा अभ्यासक्रम फारच मोठा होते. असे सूचविल्यामूळे निबंधाची व्याप्ती कमी करण्याची विनंती केली.

सर्व लोकांनी ही विनंती मान्याकेली.

2 प्रा. डॉ. एस. एम. सोनोने यांनी लॉकडाऊन मुळे हा पेपर क्रमांक दोन चा अभ्यासक्रम फारच मोठा होते. असे सूचविल्यामूळे (नंदसुत्त, कालामसुत्त, सीलानिसंसो व कोधवग्गो कमी करण्याची विनंती केली.

सर्व लोकांनी ही विनंती मान्याकेली.

3 पेपर क्रमांक दोन व तीन चे वाचन केले त्यामध्ये काही बदल करण्याचे सूचवले नाही.

4 एकंदरीत सर्व अभ्यासक्र व्हास्ट आहे. त्यामूळे काही भाग कमी काण्याची प्रा. डॉ. व्हि. एच. चौरपगार यांनी केली.

पुढील बैठकीत काही भाग कमी करु असे सर्व सदस्यांनी माण्य केले.

Dr. S.M. SONONE
Head & Research (Guide)
Dept. of Pali
Rajarshi Shahu College Latur
Pin 413512

# राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर
## पालि विभाग
## <u>सूचना</u>

दि. २२.०२.२०२१

**पाली अभ्यास मंडळाची बैठक...**

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येत आहे की, राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर येथे **दि. २७ फेब्रुवारी, २०२१** रोजी सकाळी **ठीक ११.०० वा.** पालि अभ्यास मंडळाची ऑनलाई बैठक आयोजित करण्यात आली आहे. बैठकीचे विषय : मागील बैठकीचा वृत्तांत वाचणे, फिडबॅकमध्ये काही सूचना आल्या असतील तर त्यावर चर्चा करणे, अभ्यासक्रमावर चर्चा करून त्यात काही बदल करावयाचा असल्यास आवश्यक ते बदल करणे, स्थानिक, राष्ट्रीय व आंतर राष्ट्रीय बाबींचा अभ्यासक्रमात सहभाग असावा हे निश्चत करणे आणि अध्यक्षांच्या परवानगीणे येणारे ऐन वेळीचे विषय.

तरी कृपया आपणास विनंती आहे की, आपण बैठकीस वेळेवर कनेक्ट व्हावे.

अध्यक्ष
पालि अभ्यास मंडळ

## पालि विभाग

## पालि अभ्यास मंडळाची बैठक

राजर्षी शाहु महाविद्यालय (स्वायत्त) लातूर येथे पालि विषय शिकविला जातो. अभ्यासक्रम हा विद्यार्थीभिमुख, समाजाभिमुख, आणि करिअर घडविण्यासाठी उपयुक्त असावा, यासाठी अभ्यास मंडळाचे सदस्य, विद्यार्थी, पालक, शिक्षक, प्राध्यापक, अभ्यासक, विचारवंत आणि भिक्षू यांनी Zoom App वर संयुक्त बैठक प्रा. डॉ. एस. एम. सोनोने, अध्यक्ष, पालि अभ्यास मंडळ, यांचे अध्यक्षतेखाली दि. 27–02–2021 रोजी दु. 01 : 00 वाजता पार पडली. सर्व प्रथम सर्व उपस्थितांचे शब्द सुमनांनी स्वागत करण्यात आले. त्यानंतर अभ्यासक्रमाचे वाचन डॉ. सोनोने सर यांनी स्वतः केले.

### पेपर 1 च्या अनुषंगाने

(पालि व्याकरण) प्रा. ~~थो~~रपगार यांनी प्रथम सूचना मांडली तर भदन्त महाथेरो सत्यपाल यांनी '31 दिवसांत पाली शिका' हे पुस्तक संदर्भिय म्हणून ठेवावे, अशी सूचना केली. प्रा. डॉ. वानखेडे यांनी 'पालि संवाद कौशल्ये' यांचा अंतर्भाव करावा, असे सूचविले. डॉ. प्रिया कदम यांनीही सूचना मांडली. प्रा. डॉ. भन्ते सत्यपाल यांनी डॉ. मेश्राम यांचे पुस्तक व डॉ. सोनोने सर यांची पुस्तके संदर्भिये असावित असे सांगितले. प्रा. राजेश पाटील यांनी Digital Library, Link / App सुरु करण्याची सूचना केली. तर भन्ते एस. काश्यपायन यांनी Dictionary चा उपयोग करावा असे सांगितले. डॉ. अनुसया अमृतसागर मॅडम यांनी Marathi to Pali Dictionary असावी, अशी सूचना केली. प्रा. डॉ. पगारे यांनी Activity बेस आणि शब्दसमुह, शब्दार्थ असावेत. असेही सुचविले. भन्ते सुदत्त भन्ते यांनी यावेळी आपले विचार मांडले

### पेपर 2 च्या अनुषंगाने

प्रा. डॉ. धम्मदिप वानखेडे यांनी अम्बपाली थेरीचा समावेश करण्याची सूचना केली. डॉ. अमृतसागर मॅडम यांनी रुपनंदा थेरीचा समावेश करण्याचे सूचविले. प्रा. डॉ. पगारे यांनी पेपर 2 चे नाव बदलविण्याची सूचना केली. डॉ. उपर्वट यांनी 'पालि साहित्यातील शिकवण' असे Title बैठकीनंतर सुचविले.

### पेपर क्र. 3 पालि भाषा, साहित्य व विचारवंत या अनुषंगाने

प्रा. डॉ. वानखेडे यांनी अभ्यास सहल घटक टाकले ते छान आहे असे सांगितले. प्रा. डॉ. महाथेरो सत्यपाल यांनी पालि भाषा अध्ययनाचे महत्त्व हा घटक टाकण्यास सुचविले. विपस्सनाचार्य खोब्रागडे यांचा आवा ज ऐकू आला नाही. त्यामुळे कळले नाही.

### पेपर क्र. 4 चे बौद्ध संस्कृती चे अनुषंगाने

प्रा. डॉ. पगारे यांनी 'बौद्धकालीन संस्कृतीची ओळख' असे नाव देण्याचे सुचविले. तसेच महाउपासक / उपासिका ऐवजी 'अग्र' शब्द टाकावा असेही सूचविले.

प्रा. डॉ. सत्यपाल यांनी 'अष्टशील' चा अंतर्भाव करण्याची सूचनना मांडली अभ्यासक्रम मोठा झाला असल्याचे सांगितले.

आयु. शिला डोंगरे यांनी अभ्यासक्रम MA, M.Phil, Ph.d, Net पेक्षा दर्जेदार असल्याचे सांगितले आयु. दिक्षा उके यांनी अभ्यासक्रमाविषयी सविस्तर मत मांडले.

प्रा. डॉ. एस. एम. सोनोने सर यांनी महत्त्वाचे मुद्दांवर मार्गदर्शन करुन योग्य सुचनांचे स्वागत केले व काही घटक लगेच अंतर्भूत केले.

प्रा. डॉ. पुरुषोत्तम उपर्वट यांनी वृत्तलेखन करुन आभार व्यक्त केले.

Dr. S.M. SONONE
Head & Research (Guide)
Dept. of Pali
Rajarshi Shahu College Latur
Pin 413512